# प्रेस नोट

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/ १६८ /२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
फोन नं. ०२३६२-२२८२०९
दिनांक - १५/०१/२०२१.

## प्रेस नोट दिनांक-१५/०१/२०२०

## सिंधुदुर्ग गुन्हे अन्वेषण गावठी गुळ हातभट्टी दारुवर केलेली कारवाई.-

---

सिंधुदुर्ग जिल्हयात सुरु असलेल्या अवैद्य दारु निर्मिती रोखण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री. राजेंद्र दाभाड यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला अवैध धंदे नष्ट करण्या संदर्भात सुचना दिलेल्या होत्या.

सदर सुचनांच्या अनुषंगाने सावंतवाडी तालुक्यातील आजगांव भोमवाडी येथे दिनांक १४/०१/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखा सिंधुदुर्ग यांनी आरोपीत श्रीमती कार्लु कैतान डिसोजा हिचे ताब्यातुन ५२२०/- रु किंतीची काजुची गावठी हातभट्टीची १३ लिटर दारु गैरकायदा बिना परवाना ताब्यात बाळगले स्थितीत मिळून आल्याने त्यांचेवर वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्रमांक ०२/२०२१ अन्वये महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम १९४९ कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास पोलीस ठाणे वेंगुर्ला हे करीत आहेत.

त्याचप्रमाणे आज दिनांक १५/०१/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कणकवली उपविभाग येथे पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की साकेडी बोरीचीवाडी तालुका कणकवली येथे राहणारी श्रीमती बितोज जुवाव म्हापसेकर ही गावठी गुळ हातभट्टीची दारु व गोवा बनावटीची दारु आपले ताबे कब्ज्यात बाळगुन विक्री करीत करीत आहे. तरी बातमीचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथकाने सदर ठिकाणी छापा टाकुन श्रीमती बितोज जुवाव म्हापसेकर हीचे ताब्यातुन गावठी गुळ हातभट्टीचे दारुने भरलेल्या १८० मिली मापाच्या ३२ बाटल्या व गोवा बनावटीचे दारुने भरलेल्या १८० मिली मापाच्या ३८ बाटल्या शिवाय गावठी गुळ हातभट्टी दारु गाळण्याचे उपयोगातील २८० लिटर गुळ, नवसागर मिश्रीत रसायन असे एकुण २६३६०/- रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई पोलीस ठाणे कणकवली करीत आहेत.

सदर दोन्हीही कारवाही मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री. राजेंद्र दाभाडे, व पोलीस निरीक्षक, स्थागुशा श्री. सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रामचंद्र शेळके, कृष्णा केसरकर, अनुप खंडये, प्रमोद काळसेकर, चंद्रकात पालकर, संकेत खाडये, महिला पोलीस अंमलदार श्रीमती प्रतिक्षा कोरगांवकर यांनी सहभाग घेतला.

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक , स्थागुशा सिंधुदुर्ग

प्रति, मा. जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग